Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १] बुधवार, जानेवारी ७, २०२६/पौष १७, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

अधिसूचना

क्रमांक-कावि-अ.का.-उविअ-भूसंपा-गो-प्र. ०४-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम"असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना क्रमांक ३११-२०१८, दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, चंद्रपूर (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम २१ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक-०२-एलए-६५-२०२५-२०२६, गाव रुद्रापुर रिठ., तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर. प.ह.नं. २३.

अनुक्रमांक	सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक	संपादनाखालील क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	१८८	० १८
	एकूण . .	० १८

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:-	गोसीखुर्द प्रकल्पा अंतर्गत मेंडकी उपसा सिंचन योजनेचे बांधकामाकरीता.
समाजाला मिळणारे लाभ	:-	गोसीखुर्द प्रकल्पमुळे १.९०.००० हे. आर क्षेत्रात सिंचनाचे लाभ प्राप्त होणार आहेत.

अनुसूची-तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

- निरंक -

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

- निरंक -

टीप - उक्त जमिनीच्या बाबत माहिती तथा नकाशे भूसंपादन अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

पर्वणी पाटील,

भूसंपादन अधिकारी तथा ,

उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी.

ब्रम्हपुरी :

दिनांक २ जानेवारी, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.